CMYK

दीक्षाभूमी गजबजली, ६८ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करण्यासाठी नागपुरात लोटला भीमसागर >>पान 2

मराठमोळ्या बिग बॉस विजेत्या सुरज चव्हाणला मदत करू >>पान 3

मोताळा तालुक्यात ढगफुटी सदृश्य पाऊस >>पान 4

**सुविचार**

बुध्दीला पटल्याशिवाय कोणताही विचार स्वीकारू नका.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034




ऐश्वर्या रायकडून अफवांना पूर्णविराम, अमिताभ बच्चन यांना वाढदिवसाच्या दिल्या शुभेच्छा आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 67 ■ रविवार, दि. 13 ऑक्टोबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## मला हलक्यात घेऊ नका; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा थेट ठाकरेंनाच इशारा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** काही लोकांना आता 'गर्व से कहो हम हिंदू है' शब्दाची लाज वाटत आहे. काही लोकांची हिंदू शब्द बोलायला आता जीभ कचरते. हिऱ्याच्या पोट्याला गारगोटे जन्माला आले आहेत. आम्हाला 'गर्व से कहो हम हिंदू है' बोलायला अभिमान वाटतो. मला हलक्यात घेऊ नका असे म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी थेट ठाकरेंनाच इशारा देत ठाकरे व महाविकास आघाडीवर तुफान फटकेबाजी केली.

आझाद मैदानावर दि.१२ ऑक्टोब रोजी आयोजित दसरा मेळाव्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे जनतेला संबोधीत करतांना बोलत होते. एकनाथ शिंदे यांनी हिंदूत्वाचा मुद्दा काढत थेट ठाकरेंना फटकारले आहे.

यावेळी एकनाथ शिंदे म्हणाले की, महाविकास आघाडीला घरी पाठवून जेव्हा आपले सरकार आले तेव्हा काहीजण म्हणाले हे सरकार टिकणार नाही, पंधरा दिवसात पडेल, सहा महिन्यात पडेल.पण टीका करणाऱ्यांना एकनाथ शिंदे उरुन पुरला आहे. जनतेच्या आशीर्वादाने ठासून दोन वर्ष पूर्ण केले आहे. मला हलक्यात घेवू नका असा इशाराच एकनाथ शिंदे यांनी थेट विधानसभेच्या तोंडावर उद्धव ठाकरे यांना दिला. लाडक्या बहीणींचे लाडक्या भावांचे लाडके सरकार सत्तेत आले आहे.अन्याय सहन करु नका, ही शिकवण बाळासाहेबांनी दिली आहे. त्यामुळे आम्ही अन्यायाविरोधात पेटून उठाव केला. जर हे बंड केले नसते तर शिवसैनिकांचे खच्चीकरण झाले असते. आम्ही सत्तेत आलो आणि राज्याला आम्ही तिसऱ्या नंबरवरुन पहिल्या नंबरवर आणले. महिला सक्षमीकरण, शेतकऱ्यांना विमा देण्यात राज्याला पहिल्या नंबरवर आणले. शेतकऱ्यांना वीज मोफत देणारे आमचे सरकार आहे.

लाडक्या बहीणीला आर्थिक सक्षमीकरण करण्याबरोबरच लाडक्या भावांना नोकरी देणारे आमचे सरकार आहे. कोविडला घाबरुन घरात बसणारा हा मुख्यमंत्री नाही, लोकांसाठी रस्त्यावर उतरणारा हा मुख्यमंत्री आहे. असा टोला मुख्यमंत्री शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना लगावला. तसेच यावेळी महाविकास आघाडीचा समाचार घेताना होती दाढी, म्हणून उद्धवस्त केली महाविकास आघाडी, अशी फटकेबाजी केली.कोविड काळात तुम्ही मढ्याचे टाळूवरचे लोणी खाल्ले आहे. तुमच्या तोंडाला लागलेले हे शेण लपणार नाही. कुठे फेडणार ही पाप.अशी टिका करून राज्याच्या निवडणुकीत हरियाणाची पुनरावृत्ती झाल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही. केंद्रात कोणताही आम्ही प्रस्ताव पाठवला तर नामंजूर होत नाही. आम्ही दिल्लीत विकासासाठी जातो. मुख्यमंत्री करा मुख्यमंत्री करा, अशी मागणी करायला जात नाही.असा चिमटा विरोधकांना घेतला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विकास कामाचाही लेखजोखा दसरा मेळाव्यात जनतेसमोर मांडला.




## होमगार्ड्ससाठी खूशखबर; आता मिळणार देशातील सर्वाधिक मानधन, देवेंद्र फडणवीसांची घोषणा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** पोलिसांच्या बरोबरीने राज्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी होमगार्ड्स महत्त्वाची भूमिका बजावत असतात. पण गेल्या काही काळापासून होमगार्ड्सचे मानधन वाढविण्यासंदर्भात वारंवार मागणी केली जात होती. आज अखेर दसऱ्याच्या मुहूर्तावर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही मागणी मान्य केली असून मानधनात दुप्पट वाढ केली आहे.



देवेंद्र फडणवीस यांनी एक्सवर पोस्ट करून ही माहिती दिली आहे. ते म्हणाले, ''राज्यातील होमगार्ड्सचे मानधन जवळजवळ दुप्पट करण्यासंबंधीचा शासन आदेश जारी करण्यात आला आहे. प्रतिदिन ५७० रुपयांवरून ते आता १०८३ रुपये इतके करण्यात आले आहे. आता हे मानधन >>पान २

## 'आपल्या हाती फक्त आपट्याची पानं, बाकीचे सोनं लुटून चाललेत', दसऱ्यानिमित्त राज ठाकरेंनी साधला संवाद

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दसऱ्याच्या पार्श्वभूमीवर आज राज्यातील जनतेशी संवाद साधला. एका पॉडकास्टच्या माध्यमातून त्यांनी हा संवाद साधला असून विधानसभेनिमित्त मतदारांना आवाहनही केलंय. मतदानाचं शस्त्र तुम्ही वर ठेवता, नंतर बाहेर काढून बोलता. पण मग मतदानाच्या दिवशी तुम्हाला काय होतं? असा सवाल राज ठाकरेंनी जनतेला विचारलाय. विधानसभा निवडणुकीत मतदानावेळी बेसावध राहू नका असं आवाहन राज ठाकरे यांनी केलं.

राज ठाकरे म्हणाले की, आज संधी आलीय आणि माझी तुम्हाला हात जोडून विनंती आहे. तुम्ही सर्वांना संधी दिलीत, या निवडणुकीत मतदारांनी क्रांती केली पाहिजे. दरवर्षी दसऱ्याला आपण आपट्याची पाने वाटतो, आपल्या हातात आपट्याची पाने सोडून काहीच नाही राहत, बाकीचे सगळे सोने लुटून चाललेत.

दरवर्षी आपण दसऱ्याला सोने लुटतो, एकमेकांना शुभेच्छाही देतो. पण महाराष्ट्राचं सोनं अनेक वर्षापासून लुटलं जात आहे. आपण फक्त एकमेकांना आपट्याची पानं वाटतो. आपल्या हातात आपट्याची पानं सोडून काहीच राहत नाही. बाकीचे सगळे सोनं लुटुन चाललेत. आपल्या हाती मोबाईल आला, टीव्ही आला म्हणजे प्रगती नाही. आजचा दसरा मेळावा महत्त्वाचा आहे कारण आगामी निवडणुका आहेत असंही राज ठाकरे म्हणाले.



निवडणुकीच्या तोंडावर असलेला हा दसरा खूप महत्त्वाचा आहे. अशा वेळी तुम्ही सावध रहायला हवं. तुमच्यातला राग मला कधीच दिसत नाही. त्याच त्याच लोकांना निवडून देता. मतदानाच्या दिवशी तुम्ही मतांचं शस्त्र ठेवून देता आणि नंतर बाहेर काढता. तुम्ही सर्वांना संधी देता. तुम्ही ज्यांना सांभाळलं त्यांनी तुमच्यासोबत प्रतारणा केली. आता शमीच्या झाडावरचं शस्त्र बाहेर काढण्याची हीच वेळ असल्याचं राज ठाकरे म्हणाले.

निवडणुकीत तुम्ही क्रांती करायला हवी. मी गेल्या अनेक वर्षापासून महाराष्ट्राचं स्वप्न बघतोय. हे स्वप्न साकारण्याची संधी मला मिळू द्या. जगाला हेवा वाटावा असा महाराष्ट्र मला बनवायचाय. मतदानादिवशी तुम्ही या सगळ्या लोकांचा वेध घ्या असं आवाहन राज ठाकरे यांनी केलं.

## दसऱ्यादिवशी मोठी दुर्घटना, ६ प्रवाशांनी भरलेली स्विफ्ट पुलावरुन नदीत कोसळली

दैनिक आपला विदर्भ

**लासलगाव/प्रतिनिधी :** दसऱ्यादिवशी एक मोठी दुर्घटना घडली आहे. हिंगोलीहून नातेवाईकांना भेटायला जाणाऱ्या कुटुंबाला दसऱ्या दिवशी काळानं गाठलं. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. काळ आला होता पण वेळ आली नव्हती असा काहीसा प्रकार कुटुंबियांसोबत घडला. जरा उशिर झाला असता तर दसऱ्यादिवशीच सगळं संपलं असतं.

नाशिक जिल्ह्यातील निफाडच्या रानवड इथे स्विफ्ट गाडीचा अपघात झाला. स्विफ्ट डिझायर कार कठडा नसल्याने थेट पुलावरुन खाली नदीत कोसळली. हा अपघात नेमका कसा झाला याचं कारण अद्याप समोर आलं नाही. कार इतक्या वेगानं नदीत कोसळली की कारमधील लोकांना बाहेरही येणं शक्य झालं नाही. जीव वाचवण्यासाठी त्यांची धडपड सुरू होती.

स्विफ्ट कार नदीत कोसळल्याचं स्थानिकांच्या लक्षात आलं. त्यांनी तातडीनं बचावकार्य सुरू केलं आणि अपघाताची माहिती पोलिसांना कळवली. हिंगोलीहून लासलगावला निघालेल्या निफाड मार्गावरील रानवडच्या पुलावर घडली. कारमध्ये ६ जण होते. कार पलटी होऊन पाण्यात बुडत होती. त्यामुळे त्यात अडकलेल्याना बाहेर पडता येत नव्हते.कार नदीत बुडत असल्याचे पाहून परिसरातील तरुण आणि ग्रामस्थांनी अविलंब घटनास्थळी धाव घेऊन तातडीने मदतकार्य करत सर्व ६ जणांना कार मधून बाहेर काढून त्यांचे प्राण वाचवण्यात यश आलं आहे. कारवरून चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे हा अपघाता झाला असावा असं सांगितलं जात आहे. ग्रामस्थांनी वेळीच मदत केल्यामुळे नशीब बलवत्तर होते म्हणून सर्वांचा जीव वाचला.

## इस्रायल आणि हमास युद्धाचे जगावर काय परिणाम होतील?

### मोहन भागवत म्हणाले, ''अहंकारातून हा प्रकार''

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** इस्रायल आणि हमासमधील युद्ध संपुष्टात यावे, यासाठी जगभरातून प्रयत्न होत आहेत. गाझामधील निरपराध पॅलेस्टिनींचे हत्याकांड थांबावे, हमासकडील ओलिसांची सुटका व्हावी यासाठी संयुक्त राष्ट्रांसह अमेरिका, युरोपमधील पाश्चिमात्य राष्ट्रे आणि इजिप्त, कतारसारखी मुस्लिमबहुल राष्ट्रे प्रयत्न करीत आहेत. मात्र या प्रयत्नांना अद्याप यश आलेले नाही. या युद्धामुळे सर्व जग चिंतेत आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी संघाच्या विजयादशमी सोहळ्यात भाषण करताना यावर चिंता व्यक्त केली.


इस्रायल आणि हमासच्या युद्धावर सरसंघचालक काय म्हणाले

ऑक्टोबर २०२३ पासून गाझा पट्टी आणि इस्रायलमध्ये इस्रायल आणि हमासच्या नेतृत्वाखालील पॅलेस्टिनी दहशतवादी गटांमध्ये सशस्त्र संघर्ष सुरू आहे. २००८ पासून हे गाझा–इस्रायल संघर्षाचे पाचवे युद्ध आहे आणि सर्वात महत्त्वपूर्ण लष्करी सहभाग आहे. यावर सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी चिंता व्यक्त केली. स्वार्थ आणि अहंकारातून हे युद्ध सुरू आहे. याचे जगावर काय परिणाम होतील हे कुणीच सांगू शकत नाही, अशी चिंता व्यक्त केली.



बांगलादेश म्हणतो भारतापासून भीती

यावेळी सरसंघचालकानी बांगलादेशमधील परिस्थितीवर मोठे भाष्य केले. बांगलादेशात झालेल्या हिंसक सत्तापालटाची तात्कालिक आणि स्थानिक कारणे हा त्या विकासाचा एक पैलू आहे. पण हिंदू समाजावर नाहक पाशवी अत्याचाराची परंपरा पुन्हा एकदा आली. त्या अत्याचारांच्या निषेधार्थ, तेथील हिंदू समाज यावेळी संघटित झाला आणि बचावासाठी घराबाहेर पडला, त्यामुळे >>पान २




## अत्याचाऱ्यांचे अड्डे आम्ही उद्धवस्त केले

### मनोज जरंगे पाटील यांचा सरकारवर हल्लाबोल : नारायण गडावर मराठ्यांचा लाखोच्या संख्येने दसरा मेळावा

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** मराठा समाज हा देश आणि राज्य पुढे जावं म्हणून झिजला आहे. हातात तलवारी घेतल्या. माना आमच्या कपल्या, पण न्याय तुम्हाला दिला. रक्त आमचं सांडलं. अन्यायाचा विनाश आम्ही केला. अत्याचाऱ्यांचे अड्डे आम्ही उद्धवस्त केले. मग आमच्यावर अन्याय काय? असा प्रश्नही त्यांनी या निमित्ताने केला. मी जिवंत असे पर्यंत तुमच्या डोळ्यात पाणी येवू देणार नाही. कोणी झागिरदारायची आवलाद येवू द्या. पण त्याच्या पुढे झुकायचं नाही असंही त्यांनी सरकारला ठणकावलं.



समाजावर अन्याय होणार असेल तर स्वसंरक्षण करावेच लागेल, अशा शब्दात मनोज जरंगे पाटील यांनी सरकारला दम दिला. नारायण गडावर आयोजित मराठा समाजाच्या दसरा मेळाव्यात ते उपस्थित जनसमुदाया समोर बोलत होते. यावेळी नारायण गडावर प्रचंड प्रमाणात गर्दी केली होती. यावेळी जरांगे यांनी सरकारला थेट आव्हान देत अचारसंहीता लागेपर्यंत आपण वाट पाहाणार आहोत. काही बोलणार नाही. पण ज्यावेळी अचारसंहीता लागेल त्यावेळी मात्र आपली भूमीका जाहीर करू असे मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले. शिवाय त्यावेळी आपण सांगू ते समाज ऐकाल असे वचनही त्यांनी समाजाकडून घेतले. त्यावेळी सर्वांनी हात वर करून जरांगे यांना वचन दिले. त्यावेळी मोठ्या प्रमाणात घोषणाबाजी करण्यात आली.

नारायण गडावरून बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी >>पान २

### आचारसंहिता लागेपर्यंत वाट पाहू, नाही तर दाखवून देऊ

यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी समाजाकडून एक वचन घेतलं. आपण आचारसंहीता लागण्याची वाट पाहू. तोपर्यंत सरकारने आरक्षणाबाबत निर्णय घ्यावा. जर निर्णय घेतला नाहीतर त्यांना मराठा काय असतो ते दाखवून देईल. त्यासाठी तुम्ही एक वचन द्या. मी जे सांगेन ते तुम्ही कराल. फक्त हट्ट धरू नका. मी तुमच्या शब्दाच्या पुढे कधीच जाणार नाही. तुम्हाला सोडून जाणार नाही. असे जरांगे यावेळी सांगितले. शिवाय जर कोणी समाजावर अन्याय करत असेल तर त्याला गाडल्या शिवाय राहाणार नाही असेही ते म्हणाले. मराठा समाज सर्व सहन करत आहे. पणनंतर सर्वांचा कार्यक्रम लावल्या शिवाय राहाणार नाही असा इशाराही त्यांनी दिला. तसेच मराठा आरक्षणसासाठी १४ महिन्यापासून आंदोलन सुरू आहे. ओबीसी म्हणतात आमच्यात आलात तर आमच्यावर अन्याय होईल. आमचं आरक्षण कमी होईल. पण त्याच ओबीसीमध्ये आता १७ जाती घुसवण्यात आल्या आहेत. ज्यांनी मला महाविकास आघाडीकडून लेखी घ्यायला सांगितलं होतं, की ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही. आता हे विचारणाऱ्यांना मी विचारतो या १७ जाती ओबीसीत आल्याने ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही हे तुम्ही महाविकास आघाडीकडून लिहून घेतलं होतं का? असा हल्लाबोलच त्यांनी सरकारवर केला.

CMYK

## चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू : किशोर कुमार

हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया व्यक्तिमत्त्व असलेले किशोर कुमार यांचा आज स्मृतिदिन. आजच्याच दिवशी म्हणजे १३ ऑक्टोबर १९८७ रोजी किशोर कुमार यांचे निधन झाले. किशोर कुमार हे हिंदी चित्रपट सृष्टीला लाभलेले अनमोल रत्न आहे. चित्रपट निर्मितीतील असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात त्यांचा सहभाग नाही. पार्श्र्वगायक, संगीतकार, गीतकार, निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता, पटकथा लेखक असे चित्रपट निर्मितीतील सर्वच प्रकारात त्यांनी मुक्त विहार केला. किशोर कुमार यांचे मूळ नाव आभास कुमार गांगुली असे होते. ४ ऑगस्ट १९२९ रोजी मध्यप्रदेशातील खांडवा येथे किशोर कुमार यांचा जन्म झाला. त्यांचे वडील कुंजलाल गांगुली हे वकील होते तर आई गौरादेवी या गृहिणी होत्या. त्यांचे थोरले बंधू अशोक कुमार आणि अनुप कुमार हे दोघेही हिंदी चित्रपट सृष्टीत नायक म्हणून कार्यरत होते. किशोर कुमार हे देखील आपल्या भावांप्रमाणे चित्रपट सृष्टीत नशीब आजमावण्यासाठी धडपडत होते. १९५० साली कुंजलाल गांगुली यांनी किशोर कुमार यांना मुक्कदर या चित्रपटात काम दिले. १९५२ ते १९६० या दरम्यान किशोर कुमार यांनी बऱ्याच चित्रपटात काम केले. नोकरी, अधिकार, धोबी डॉक्टर, ईलजाम, मिस माला, झलक हे चित्रपट त्यांनी १९५४ या एकाच वर्षात पूर्ण केले. १९५६ साली तर त्यांनी ९ चित्रपटात भूमिका केल्या. हा त्याकाळी एक विक्रम होता. त्यानंतर ते अभिनयासाठी गायनही करु लागले. अभिनय आणि गायन असा त्यांचा समांतर प्रवास सुरू झाला. किशोर कुमार यांनी आपल्या मिश्किल स्वभावाने चित्रपट सृष्टीत विनोदी भूमिकांचा नवा ट्रेंड आणला. अभिनय करताना गायन आणि संगीताचा तालावर थिरकने असा नवा ट्रेंड त्यांनी सुरू केला. किशोर कुमार यांच्या या नवीन स्टाईलने तरुणांना भुरळ घातली. त्याकाळातील सर्व दिग्गज नायिकांसोबत त्यांनी भूमिका केल्या. मधुबाला सोबत त्यांची जोडी विशेष जमली. अभिनयासोबत गायनातही ते यशस्वी होऊ लागले. त्यांची गाणी लोकप्रिय होऊ लागली. किशोर कुमार यांना संगीतकार सचिन देव बर्मन यांनी अनेक संधी दिल्या. सचिन देव बर्मन यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली त्यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. पुढे सचिन देव बर्मन यांचे चिरंजीव राहुल देव बर्मन उर्फ पंचमदा यांच्याशी जोडी जमली या जोडीने अनेक लोकप्रिय गाणी चित्रपट सृष्टीला दिली. लता मंगेशकर आणि आशा भोसले यांच्यासोबत त्यांनी शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. किशोर कुमार यांनी तीन दशकांहून आधीक काळ गायन केले. देव आनंद यांच्यापासून अनिल कपूर यांच्यापर्यंत सर्वच नायकांना त्यांनी आवाज दिला. किशोर कुमार यांचा आवाज ज्या नायकासाठी वापरला गेला तो नायक स्टार बनला. राजेश खन्ना यांना बॉलिवूडचा सुपरस्टार बनवण्यामागे किशोर कुमार यांचाही मोठा हात आहे. राजेश खन्ना यांच्या सर्व चित्रपटांमध्ये किशोर यांचाच आवाज वापरला गेला. आराधना पासून जमलेल्या या जोडीने पुढे इतिहास घडवला. या जोडीची सर्व गाणी हिट झाली. ज्या ज्या वेळी राजेश खन्ना यांचे नाव निघते त्या त्या वेळी किशोर कुमार यांचेही नाव घेतले जाते. किशोर कुमार यांनी ४०० हुन अधिक चित्रपटात शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. नायक, गायक यासोबत ते दिग्दर्शकही होते. चलती का नाम गाडी यासारख्या विनोदी चित्रपटसोबतच दूर गगन की छाव मे यासारखा गंभीर चित्रपटही त्यांनी काढला. त्यांनी काही चित्रपटांना संगीतही दिले तर काही चित्रपटांसाठी गाणीही लिहिली. किशोर कुमार यांनी चित्रपटाच्या पटकथाही लिहील्या. असा हा हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू १३ ऑक्टोबर १९८७ रोजी जगाला अलविदा करून कायमचा निघून गेला. किशोर कुमार यांच्या जादुई आवाजाची मोहिनी आजही कायम आहे. आजही त्यांची गाणी पूर्वीइतकीच लोकप्रिय आहेत. किशोर कुमार यांनी चित्रपट सृष्टीवर असा ठसा उमटवला आहे की त्यांच्या नावाशिवाय हिंदी चित्रपट सृष्टीचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. किशोर कुमार यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# दीक्षाभूमी गजबजली, ६८ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करण्यासाठी नागपुरात लोटला भीमसागर

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी** : आज नागपूरच्या प्रसिद्ध दीक्षाभूमी येथे ६८ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा केला जात आहे. त्यासाठी देशभरातून हजारो आंबेडकरी अनुयायी नागपूरला दाखल झाले आहेत. १९५६ मध्ये आजच्याच दिवशी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. तेव्हापासून दीक्षाभूमी येथे विजयादशमीला धम्मचक्र प्रवर्तन दिन म्हणून साजरा केला जातो. यावेळी शेकडो आंबेडकरी अनुयायांकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थीकलशाचे दर्शन देऊन बौद्ध धर्माची दीक्षा घेण्याची परंपरा आहे. दीक्षाभूम ीला आंबेडकरी अनुयायी आपले प्रेरणास्थान मानतात. त्यामुळे देशभरातून लाखोंचा जनसमुदाय हा दीक्षाभूमीला आजच्या दिवशी आवर्जून हजेरी लावतात.

या दिवसाची आठवण आणि बाबासाहेबांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दरवर्षीप्रमाणे यंदाही अनुयायी दीक्षाभूमीवर दाखल झाले आहेत. ६८ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळा शनिवारी सायंकाळी ६ वाजता भिक्खू संघाच्या उपस्थितीत पार पडणार आहे. यंदा प्रथमच मंचावर कुठल्याही राजकीय नेत्याला स्थान दिले जाणार नाही. तर दीक्षाभूमीवर यंदाही दोनशेच्यावर पुस्तकांची दुकाने लावण्यात आली आहेत. यात बुद्ध, फुले, कबीर, आंबेडकर, पेरियार या महापुरुषांवर आधारित पुस्तके आहेत.

६८ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमीवर येणाऱ्या लाखो अनुयायांच्या सुविधेसाठी महानगरपालिका तर्फे साहित्यभूषण अण्णाभाऊ साठे स्मारकाजवळ मनपा नियंत्रण कक्ष उभारण्यात आला आहे. तर धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दीक्षाभूमीवर येणाऱ्या बौद्ध अनुयायांच्या संख्या लक्षात घेता ११ ते १४ ऑक्टोबर या कालावधीमध्ये नागपूर म हानगरपालिकेद्वारे दीक्षाभूमीवर अनुयायांसाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

तर दीक्षाभूमीवर येणाऱ्या मार्गावर चार ठिकाणी मनपाचे आरोग्य तपासणी केंद्र, २४ तास रुग्णवाहिका, पिण्याच्या शुद्ध पाण्याची व्यवस्था, स्वच्छतेसाठी सफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती, मदतीसाठी साहित्यभूषण अण्णाभाऊ साठे स्मारकाजवळ नियंत्रण कक्ष, अग्निशमन पथक, शौचालयांची व्यवस्था, निवारा व्यवस्था, प्रकाश व्यवस्था, सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे, परिवहन व्यवस्था, अग्निशमन पथक आदी सर्व सुविधा मनपाद्वारे दीक्षाभूमीवर येणाऱ्या बौद्ध अनुयायांसाठी करण्यात आल्या आहेत.

तसेच, एखादी आकस्मिक घटना घडल्यास आपदाग्रस्तांना तातडीने औषधोपचार मिळावा, यासाठी डॉक्टर, परिचारिका कर्मचारी ॲम्बुलन्स उपयुक्त साधनांसह २४ तास उपचार केंद्र सुरु राहणार आहे. याशिवाय रहाटे कॉलनी चौक, नीरी रोड, काचीपूरा चौक, बजाज नगर चौक ते लक्ष्मीनगर चौक येथे औषधोपचार व तात्पुरते दवाखान्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

# नागपूर महानगरालगतच्या ग्रामीण भागासाठी पायाभूत सुविधा भक्कम करु: उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## एकूण ८७२ कोटी ३६ लाख खर्चाच्या अमृत-२ योजनेंतर्गत मलनि:सारण व गटरलाईन प्रकल्पाचे भूमिपूजन

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी** : नागपूर महानगरासह लगतच्या ग्रामीण भागामध्ये गत दहा वर्षात मोठ्या प्रमाणात नागरी वस्त्या झाल्या. यासाठी पायाभूत सुविधा नव्याने निर्माण करणे आवश्यक होते. रस्ते आवश्यक होते. नवीन विकसित झालेल्या अधिवास क्षेत्रात पिण्याच्या पाण्याची सुविधा देणे गरजेचे होते. मी मुख्यमंत्री असताना सर्वात अगोदर प्राधान्याने येथील पाण्याचा प्रश्र्न मार्गी लावला. इतर पायाभूत सुविधा भक्कम करण्यासाठी आपण एनएमआरडीएच्या माध्यमातून परिपूर्ण नियोजन केले. नरसाळा हुडकेश्र्वर या भागातील जनतेसाठी तेव्हा दूरदृष्टी ठेवून केलेल्या नियोजनामुळे विकासकामांना आता नियोजनबद्ध गती देता आल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.





अमृत-२ योजना अंतर्गत कामठी विधानसभा क्षेत्रातील २५ गावांसाठी ७१६ कोटी ९० लाख रुपयांचा महत्वाकांक्षी गटरलाईन व मलनि:सारण प्रकल्प आणि हुडकेश्र्वर नरसाळा भागातील ११५ कोटी ४६ लाख रुपयांच्या मल नि:सारण प्रकल्पाच्या भूमिपूजन सभारंभात ते बोलत होते. यावेळी आमदार चंद्रशेखर बावनकुळे, आमदार टेकचंद सावरकर, महानगर पालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, नागपूर सूधार प्रन्यासचे सभापती संजय मीना, माजी आमदार सुधाकर कोहळे, मल्लिकाजून रेड्डी, अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर उपस्थित होते. नगर पंचायत बेसा, पिपळा, बहादुरा, बिडगाव , हुडकेश्र्वर, नरसाळा यासह परिसरातील लहान गावांसाठी गटरलाईन व मल नि:सारण प्रकल्प हे आवश्यक होते. मल नि:सारण प्रकल्पामुळे पर्यावरणाचा प्रश्र्न मार्गी लागणार आहे. शिवाय स्वच्छतेमुळे आरोग्य व इतर प्रश्र्न सुटणार आहेत. आपल्या भागातून जाणारी पोहरा नदी ही प्रकल्प नसल्याने नाल्यात रुपांतरित झाली आहे. या नदीलाही आता प्रकल्प पूर्ण झाल्यावर स्वच्छतेचे रुप प्राप्त होणार असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. या प्रकल्पासाठी आमदार चंद्रशेखर बावनकुळे व आमदार टेकचंद सावरकर यांनी पुढाकार व पाठपुरावा केल्यामुळे या प्रकल्पाला गती मिळाल्याचा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी केला.

वास्तविक या व इतर प्रकल्पासाठी मधल्या काळात कसलाही निधी मिळाला नाही. याची कमतरता आपले शासन आल्यानंतर आपण आता भरुन काढत कामांना गती दिली आहे. या प्रकल्पांना निधीही उपलब्ध करुन दिला आहे असे ते म्हणाले.

आपल्या योजना या परिवर्तनाचे प्रतिक झाल्या आहेत. आपण लाडक्या बहीणींसाठी योजना आणली. लेक लाडकी सारखी योजना आणली. यात एक लाख रुपयांपर्यतची मदत आपण मुलींना देतो. उच्च शिक्षणासाठी शंभर टक्के फीस शासनामार्फत आपण देत आहोत. याच्या जोडीला आपण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी लखपती दिदीची योजना दिली आहे. आजच्या घडीला ११ लाख लखपती दिदी तयार झाल्या असून आपण एक कोटी लखपती दिदी तयार करणार आहोत. यात नागपूर जिल्ह्यात सर्वात जास्त लखपती दिदी तयार करु असे ते म्हणाले. सर्वसामान्य समाजातील घटकाला, माणसांना केंद्रस्थानी ठेवून आपण योजना आखल्याचे त्यांनी सांगितले.

आपले सरकार सर्वांसाठी प्रयत्न करीत आहे. शेतकऱ्यांनी आपण वीज बिल माफी दिली आहे. याच्या जोडीला जवळपास १४ हजार मेगावॅट विजेची उपलब्धता सौर ऊर्जेच्या माध्यमातून करीत आहोत. कोणत्याही स्थितीत दररोज बारा तास वीज शेतकऱ्यांना आपण देत असल्याचे त्यांनी सांगितले. ही दिवसाचे बारा तास वीज असेल. सौर तंत्रज्ञानामुळे ही वीज आठ रुपयांऐवजी तीन रुपये प्रती युनीट शासनाला पडत आहे. शेतकऱ्यांना आपण मोफत वीज देत आहोत. शिवाय सरकारचे आपण यातून १० हजार कोटी रुपये वाचवित असल्याचे त्यांनी सांगितले. राज्याचे हे मॉडेल इतर राज्यांनी अंगिकारावे, असे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी इतर राज्यांना सांगितल्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

यावेळी आमदार चंद्रशेखर बावनकुळे, आमदार टेकचंद सावरकर यांनी विविध विकास कामांचा आढावा मांडला. बेसा येथील भूमिपूजन समारंभाचे प्रास्ताविक नागपूर सूधार प्रन्यासचे सभापती संजय मीना यांनी तर नरसाळा येथील आयोजित कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी केले.

पान १ वरून...

### होमगार्ड्ससाठी खूशखबर

देशात सर्वाधिक आहे.''

पोलिसांच्या बरोबरीने राज्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी होमगार्ड्स महत्त्वाची भूमिका बजावत असतात. पण गेल्या काही काळापासून होमगार्ड्सचे मानधन वाढविण्यासंदर्भात वारंवार मागणी केली जात होती. आज अखेर दसऱ्याच्या मुहूर्तावर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही मागणी मान्य केली असून म ानधनात दुप्पट वाढ केली आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी एक्सवर पोस्ट करून ही माहिती दिली आहे. ते म्हणाले, ''राज्यातील होमगार्ड्सचे मानधन जवळजवळ दुप्पट करण्यासंबंधीचा शासन आदेश जारी करण्यात आला आहे. प्रतिदिन ५७० रुपयांवरून ते आता १०८३ रुपये इतके करण्यात आले आहे. आता हे मानधन देशात सर्वाधिक आहे.''

देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, ''याशिवाय विविध भत्त्यांची रक्कम सुद्धा दुप्पट करण्यात आली आहे. उपहार भत्ता १०० वरून २०० रुपये तर भोजन भत्ता १०० वरून २५० रुपये इतका करण्यात आला आहे. राज्यातील सुमारे ५५,००० होमगार्डना या निर्णयाचा लाभ मिळेल. १ ऑक्टोबर २०२४ पासून ही वाढ देण्यात येईल. गेल्याच महिन्यात सुमारे ११,२०७ होमगार्ड्सची भरती प्रक्रिया सुद्धा पूर्ण करण्यात आली आहे. सध्या त्यांचे प्रशिक्षण करण्यात येते आहे. सर्वांना विजयादशमीच्या हार्दिक शुभेच्छा!

दि. १ ऑक्टोबर रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत तब्बल ३८ महत्वाचे निर्णय घेण्यात आले होते. या बैठकीत राज्यातील होमगार्ड यांच्या भत्त्यात भरीव वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. होमगार्ड यांच्याबरोबरच कोतवालांच्या मानधनात दहा टक्के वाढ, तसेच अनुकंपा धोरणाही लागू करण्यात येणार, ग्राम रोजगार सेवकांना आता दरमहा ८ हजार रुपये मानधन देण्यात येणार असल्याचे मंत्रिमंडळ बैठकीनंतर जाहीर केले गेले.

९ ऑक्टोबर रोजी काढलेल्या शासन निर्णयाची प्रत देवेंद्र फडणवीस यांनी एक्स वर शेअर केली आहे. शासन निर्णयात होमगार्डची स्थापना आणि त्यांच्या जबाबदाऱ्यांची माहिती देण्यात आली आहे. ''होमगार्ड संघटनेची स्थापना दि. ६ डिसेंबर १९४६ रोजी झाली. सदर संघटनेत स्वत:चा व्यवसाय व नोकरी सांभाळून स्वयंस्फुर्तीने देशसेवा करण्याच्या उद्देशाने नागरिकांची मानसेवी स्वरुपात होमगार्ड स्वयंसेवक म्हणून भरती करुन घेण्यात येते. कायदा व सुव्यवस्था राखणे, नैसर्गिक, मानवनिर्मित आपत्तींमध्ये पोलिसांना सहाय्य करणे, तसेच संप काळात अत्यावश्यक सेवा सुरू ठेवण्यास सहाय्य करणे, ही होमगार्ड स्वयंसवेकांची प्रमुख कर्तव्य आहेत.''

### इस्त्रायल आणि हमास

काही प्रमाणात संरक्षण मिळाले. पण जोपर्यंत हा अत्याचारी मूलतत्त्ववादी स्वभाव तेथे आहे तोपर्यंत तेथील हिंदूंसह सर्व अल्पसंख्याक समाजाच्या डोक्यावर धोक्याची टांगती तलवार राहणार आहे. त्यामुळेच त्या देशातून भारतात होणारी बेकायदेशीर घुसखोरी आणि परिणामी लोकसंख्येचा असमतोल हा देशातील सर्वसामान्य नागरिकांमध्ये गंभीर चिंतेचा विषय बनला आहे. या अवैध घुसखोरीमुळे परस्पर सौहार्द आणि देशाच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. बांगलादेशात अल्पसंख्याक बनलेल्या हिंदू समाजाला औदार्य, मानवता आणि सद्भावना यांना पाठिंबा देणाऱ्या सर्वांची, विशेषत: भारत सरकार आणि जगभरातील हिंदूंची मदत आवश्यक आहे. असंघटित आणि दुर्बल राहणे म्हणजे दुष्टांच्या अत्याचारांना आमंत्रण देणे, हा धडा जगभरातील हिंदू समाजानेही घेतला पाहिजे. पण प्रकरण इथेच थांबत नाही. आता भारतातून सुटण्यासाठी पाकिस्तानला भेटल्याची चर्चा आहे. अशा चर्चा घडवून भारतावर कोणकोणत्या देशांना दबाव आणायचा आहे, हे सांगण्याची गरज नाही. त्याची उपाययोजना हा शासनाचा विषय आहे असे भागवत म्हणाले.

### अत्याचाऱ्यांचे अड्डे

बोलताना मराठा समाजाचा शौर्य पराक्रम इतिहास समोर मांडून आताच्या परिस्थितीवर भाष्य केले.ते म्हणाले की मराठा समाजाचे काय चुकले आहे. मराठा समाजाने कधीही जातीयवाद केला नाही. हा समाज अन्याया विरूद्ध लढला आहे. जर आपली अडवणूक होणार असेल तर मायबापानो तुम्हालाही उठाव करावाच लागणार आहे असे ते म्हणाले. एकेकाळी १८ पगड जातीला सोबत घेऊन त्यांचे पालनपोषण केले.हे काय आम्ही पाप केले आहे का.आम्ही सर्वांना सोबत घेऊन चालतो हे आमचे पाप आहे.माझा समाज या राज्यातल्या जनतेसाठी झिजला आहे. स्वता या समाजाने दुसऱ्यासाठी झिज केली. आम्ही समाजाच्या हितासाठी मागतोय त्याच्यात काय चुकीचं आहे. आम्हाला सांगा आमची चुक काय. आमचे दारिद्र कमी व्हावं म्हणून आम्ही संघर्ष केलाय असे ते यावेळी म्हणाले. तसेच यावेळी त्यांनी आपल्या विरुद्ध षडयंत्र रचलं जात आहे. आपल्याला टार्गेट केलं जात आहे. आता ही गर्दी पाहून त्यांचे डोळे उघडले असतील. त्यांनी आपल्याला टार्गेट केले की संपलं. जर न्याय मिळवायचा असेल तर यावेळी आपल्याला उलथापालथ करावीच लागणार आपल्या नाकावर टिच्चून जर कोणते निर्णय घेणार असतील. समाजावर अन्याय होणार असेल तर त्यांना आपल्याला त्यांची जागा दाखवावी लागणार आहे. असे सांगत सरकारवरील रोष त्यांनी व्यक्त केला. शिवाय सरकारला यातून इशाराही त्यांनी दिला. तसेच यावेळी समाज, शेतकरी महत्वाचा आहे. मी समाजासाठी लढत आहे परंतु मला संपवण्यासाठी षडयंत्र रचले गेले. पण मलाही समाजाला होणारा त्रास सहन होत नाही. पण आता एक घाव दोन तुकडे करण्याची वेळ आली आहे असेही ते म्हणाले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...


### शहराची स्वच्छता करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांनी झाडू, घंटागाडी, टोपले, फावडे यांचे विधिवत केले पूजन



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजी नगर महापालिका सफाई विभागाच्या वतीने आज सकाळी सर्व शहराची स्वच्छता करून त्यांचे उपजीविका भागवणारे जे शस्त्र आहे झाडू टोपले फावडे घंटागाडी यांची आज विजयादशमी निमित्त विधीवत पूजा करण्यात आली. सर्वच शासकीय निमशासकीय कार्यालयांमध्ये त्यांच्या उपजीविकेचे साधन असते त्याची विधिवत पूजा केली जाते हे आमच्या उपजीविकेचे साधन आहे आणि यावरच आमच्या कुटुंबाचे पालन पोषण होत असतं त्यामुळे हेच आमचे शस्त्र आणि हीच आमची लक्ष्मी या उद्देशाने आज टोपले पावडे घंटागाडी झाडू यांच्या आम्ही पूजन केल्याचे मनपा सफाई अतिरिक्त आयुक्त जी सुरडकर यांनी सांगितले.

### सोलापुरात वीस हजार मीटर दोऱ्याचा वापर करून साकारली गौतम बुद्धांची भव्य प्रतिमा



दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** सोलापुरात आज धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त वीस हजार मीटर दोऱ्याचा वापर करून तथागत भगवान गौतम बुद्धांची भव्य दिव्य प्रतिमा साकारण्यात आली आहे.ही कलाकृती सकरण्यासाठी जवळपास पाच दिवसांचा कालावधी लागला आहे. चित्रकार विपुल मिरजकर आणि त्याच्या टीमने ही प्रतिमा साकरण्यासाठी मेहनत घेतली.आज धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त सोलापुरातील सात रस्ता परिसरात सीएम बहुउद्देशीय संस्थेकडून दर्शन घेण्यासाठी ही प्रतिमा ठेवण्यात आली आहे.

### अजय जडेजा बनला जाम नगरच्या राजघराण्याचा वारस, एवढ्या कोटींची आहे संपत्ती

नवी दिल्ली : भारताचा माजी क्रिकेटपटू अजय जडेजा याच्यासाठी दसऱ्याचा दिवस आनंद घेऊन आला आहे. खरे तर गुजरातच्या जामनगर येथील जाम साहेब शत्रुशल्यसिंहजी जडेजा यांनी या शुभ मुहूर्तावर त्याला आपला उत्तराधिकारी म्हणून घोषित केले आहे. आतापासून तो गुजरातच्या जामनगर राजघराण्याचा पुढचा जाम साहेब असेल. शत्रुशल्यसिंहजी यांनी एक पत्र जारी करून ही माहिती दिली आहे. त्यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की 'दसऱ्याच्या दिवशी पांडव वनवासातून विजयी होऊन परतले. या शुभ प्रसंगी माझी कोंडी संपली आहे आणि मी अजय जडेजाला माझा उत्तराधिकारी बनवण्याचा प्रस्ताव ठेवतो. जामनगरच्या लोकांसाठी तो आशीर्वाद ठरेल आणि पूर्ण निष्ठेने त्यांची सेवा करेल असा मला विश्वास आहे. याबद्दल मी त्याचा ऋणी राहीन.

माजी क्रिकेटपटू अजय जडेजा हा जामनगरचा असून तो नवानगर संस्थानातील आहे. याशिवाय, तो रणजितसिंहजी जडेजा आणि दलीपसिंहजी जडेजा यांच्या कुटुंबातून येतो, ज्यांच्या नावावर भारताची देशांतर्गत रणजी ट्रॉफी आणि दुलीप ट्रॉफी खेळली जाते. रणजितसिंहजी जडेजा आणि दलीप सिंगजी यांनी क्रिकेटपटू असण्याबरोबरच नवानगर राज्यावरही राज्य केले. याशिवाय शत्रुशल्यसिंहजींचे वडील दिग्विजयसिंहजी हे त्यांच्या जवळचे होते. त्याच वेळी, ८५ वर्षांचे शत्रुशल्यसिंहजी निपुत्रिक आहेत, त्यामुळे त्यांना त्यांचा वारस निवडावा लागला. त्यामुळेच त्यांनी अजय जडेजाला उत्तराधिकारी म्हणून निवडले.

आम्ही तुम्हाला सांगतो की शत्रुशल्यसिंहजी हे स्वत: क्रिकेटर राहिले आहेत. १९५८-५९ मध्ये त्यांनी सौराष्ट्रकडून बॉम्बेविरुद्ध प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केले. त्यांनी १९५९-६० मध्ये तीन सामने, १९६१-६२ मध्ये चार आणि १९६२-६३ मध्ये चार सामने खेळले. ते इंग्लंडच्या कौंटी क्रिकेट क्लब ससेक्सकडूनही खेळले होते. मात्र, ते कधीही टीम इंडियाकडून खेळले नाही. शत्रुशल्यसिंहजींनी त्यांच्या प्रथम श्रेणी कारकिर्दीत २९ सामने खेळले, ज्यात त्यांनी २२ च्या सरासरीने १०६१ धावा केल्या आणि ३६ विकेट्सही घेतल्या.

अजय जडेजा नवानगरच्या राजघराण्यातील असून त्याचे वडील दौलतसिंहजी जडेजा हे राजकारणी होते. ते जामनगरमधून तीन वेळा खासदारही निवडून आले होते. म्हणजे तो आधीच श्रीमंत होता. पुढे क्रिकेटने त्याच्या संपत्तीत भर घातली. फायनान्शियल एक्सप्रेसच्या रिपोर्टनुसार अजय जडेजा २५० कोटींचा मालक आहे.

# मराठमोळ्या बिग बॉस विजेत्या सुरज चव्हाणला मदत करू

## सुरज चव्हाणनी घेतली उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट

दैनिक आपला विदर्भ





**पुणे/प्रतिनिधी :** मराठमोळ्या बिग बॉस विजेत्या सुरज चव्हाण हा गरीब कुटुंबातील आहे. फारसे शिक्षणही झालेले नाही, मात्र तो रील्सच्या माध्यमातून फेमस झाला आहे. बिग बॉस मध्ये ही तो विजेता झाला आहे. सुरजला ज्या क्षेत्राची आवड आहे. त्यासाठी त्याला मदत करू असे, मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केले. नुकतीच बिग बॉस विजेता सुरज चव्हाण याने महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. यावेळी ते बोलत होते. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, सुरज चव्हाण हा एका गरीब कुटुंबात जन्मलेला तरूण आहे.आई वडील लवकर गेल्याने त्याला शिक्षण घेता आले नाही.शिक्षणाच्या बाबतीत मागे राहिला पण रिल्स बनवून तो फेमस झाला आणि बिग बॉस मध्ये ही सूरज चव्हाण यांनी बाजी मारली आहे. सुरज बिंधास्त असून त्याच्या स्वावभवामुळे तो बऱ्याच जणांना भावला आहे, तो सगळ्यात मिसळून राहिला. आता आम्ही त्याला चांगल घर बांधून देणार अहोत. त्याच्या हक्काचं घर त्याला देवू,त्याला ज्या क्षेत्राची आवड आहे, त्यात त्याला मदत करू, सुरज चव्हाण संदर्भात मी रितेशशी देखील बोलणार आहे. त्याचं आयुष्य योग्य मार्गी लागावं ही भावना असून त्यावर लक्ष देणार आहे.मी आलिकडच्या काळात निवडणुकीच्या गडबडीत होतो. पण थोड फार सुरज चव्हाण यांचा शो बघत होतो. त्यावेळेस सुरज हा नक्कीच जिंकेल असा विश्र्वास होता असे मतही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केले.

# ठरलं! नायब सिंह सैनी 'या' दिवशी हरियाणाच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार; मोदीही उपस्थित राहणार

नवी दिल्ली : हरियाणा विधानसभा निवडणुकीत बहुमत मिळवणारी भारतीय जनता पार्टी आता सत्तास्थापन करणार आहे. येत्या १७ ऑक्टोबर रोजी भाजपा नेते व माजी मुख्यमंत्री नायब सिंह सैनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतील. त्यांच्याबरोबर भाजपाचे इतर काही आम दार मंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. पंचकुला सेक्टर ५ येथे सकाळी १० वाजता हा शपथविधी समारंभ पार पडेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह भाजपाचे अनेक वरिष्ठ नेते या शपथविधी सोहळ्याला हजेरी लावणार आहेत.हा शपथविधी १५ ऑक्टोबरला होणार असल्याची चर्चा रंगत होती. मात्र, आता १७ ऑक्टोबर ही तारीख जाहीर करण्यात आली आहे.

केंद्रीय मंत्री व हरियाणाचे माजी मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर म्हणाले, आम्हाला पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून मंजुरी मिळाली आहे. येत्या १७ ऑक्टोबर रोजी पंचकुलाम ध्ये मुख्यमंत्री व इतर मंत्र्यांचे शपथविधी पार पडतील. अलीकडेच दिल्लीत खट्टर व नायब सिंह सैनी यांची भेट झाली होती. दरम्यान, नायब सिंह सैनी यांच्या शपथविधीसाठी हरियाणा भाजपाने तयारी सुरू केली आहे.

माजी मुख्यमंत्री म नोहरलाल खट्टर यांच्या जागी नायब सिंह सैनी हरियाणाचे मुख्यमंत्री झाले होते. खट्टर यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला आणि त्यांनी लोकसभेची निवडणूक लढवली. तर, नायब सिंह सैनी मुख्यमंत्री झाल्याने भाजपाची राज्यातील राजकीय समीकरणं बदलली. याचा निवडणुकीत भाजपाला फायदा झाला. सैनी हे ओबीसी असल्याने राज्यातील जातीय समीकरणं बदलली. भाजपाने या निवडणुकीत सामाजिक व राजकीय समीकरणांचा योग्य म ेळ साधला आणि त्यांना त्याचा निवडणुकीत फायदा झाला.

भाजपाने सलग तिसऱ्यांदा हरियाणाचा गड जिंकला

हरियाणा विधानसभा निवडणुकीत भाजपा आणि काँग्रेसमध्ये जोरदार रस्सीखेच पाहायला मिळाली होती. ५ ऑक्टोबर रोजी मतदान पार पडल्यानंतर एक्झिट पोल समोर आले होते. जवळपास सर्वच एक्झिट पोलच्या आकडेवारीनुसार, हरियाणात भारतीय जनता पक्षाला मोठा धक्का बसण्याची शक्यता वर्तवण्यात आली होती, तर १० वर्षांनंतर काँग्रेस सत्तेत परतण्याची शक्यता वर्तवण्यात आली होती. मात्र, हरियाणा निवडणुकीत भाजपाने मोठी मुसंड मारली. भाजपाने राज्यातील ९० पैकी ४९ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवलं. तर काँग्रेसला ३७ जागांवर सम ाधान मानावं लागलं आहे.

### हडपसर भागात खोक्यात तरुणाचा मृतदेह सापडला, तरुणाची ओळख पटविण्याचे काम सुरु

**पुणे/प्रतिनिधी :** तरुणाचा खून करुन मृतदेह खोक्यात बांधून फेकून दिल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. हडपसर भागातील हिंगणे मळा परिसरातील कालव्याजवळ खोके सापडले. खून झालेल्या तरुणाची ओळख पटलेली नाही.हिंगणे मळा परिसरात शुक्रवारी सायंकाळी एक खोके नागरिकांनी पाहिले. तरुणाचे हात पाय बांधण्यात आले. खोके बंद करून ते कालव्याजवळ असलेल्या मोकळ्या जागेत फेकून देण्यात आले होते. याबाबतची माहिती रहिवाशांनी पोलिसांना दिली. त्यानंतर हडपसर पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले. खून झालेल्या तरुणाचे वय अंदाजे ३० ते ३५ वर्ष आहे. त्याची ओळख पटलेली नाही. खून झालेल्या तरुणाची ओळख पटविण्याचे काम सुरू असल्याची माहिती हडपसर पोलिसांनी दिली.तरुणाचा खून वैमनस्य किंवा अनैतिक संबंधातून झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. पोलिसांनी शहरातून बेपत्ता झालेल्या तरुणांची माहिती संकलित करण्यास सुरुवात केली. खून झालेला तरुण हडपसर, लोणी काळभोर भागातील असल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

### महाराष्ट्रात ग्रामीण भागात पहिला घरकुल भांडी वाटपाचा कार्यक्रम संपन्न

दैनिक आपला विदर्भ



**नाशिक/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात ग्रामीण भागात पहिला घरकुल भांडी वाटपाचा कार्यक्रम संपन्न तर जवळपास दोन हजार लाभार्थ्यांनी घेतला लाभ.

चांदवड देवळा विधानसभा मतदारसंघात नेहमीच विविध योजना राबवत अग्रेसर असणारे भूषण भैय्या कासलीवाल यांनी गोरगरिबांसाठी आणि जनकल्याणासाठी विविध योजना राबवत जनहितार्थ आपले निर्णय घेतले आहे.

अशाच कल्याणकारी योजनांपैकी घरकुल कामगार महिलांसाठी शासनाची घरगुती भांडी संच वाटप योजना आज चांदवड मनमाड रोडवरील रेणुका लॉन्स येथे महाराष्ट्र प्रदेश बांधकाम कामगार युवा प्रदेश अध्यक्ष विजय हरगुडे, व विक्रम अण्णा नागरे उत्तर महाराष्ट्राचे कामगार नेते, तसेच भूषण भैय्या कासलीवाल चांदवड देवळा विधानसभा निवडणूक प्रमुख, स्वर्गीय माजी आमदार जयचंद दीपचंद कासलीवाल चॅरिटेबल ट्रस्ट संस्थेचे अध्यक्क्षा रिकुताई कासलीवाल ,चिंतामणी शिक्षण प्रचारक संस्थेच्या अध्यक्ष अर्चनाताई कासलीवाल समन्वयक वर्धमान पांडे चांदवड शहराचे भाजपा अध्यक्ष प्रशांत ठाकरे यांच्या समवेत घेण्यात आला.

तसेच सरकारच्या माध्यमातून सतत हा भांडी वाटपाचा कार्यक्रम चालू राहणार अशी प्रतिक्रिया विजय हरगुडे महाराष्ट्र बांधकाम कामगार युवा प्रतिष्ठान अध्यक्ष यांनी दिली. बाईट विजय हरगुडे महाराष्ट्र प्रदेश बांधकाम युवा प्रदेश अध्यक्ष त्याचप्रमाणे संपूर्ण महाराष्ट्रात भांडी वाटपाचा कार्यक्रम होत असून तर आपल्या चांदवड तालुक्यात देखील व्हावा अशी महिलांची मागणीनुसार भूषण भैय्यांनी विविध स्तरावर सरकार स्तरावर बोलणं करून हा कार्यक्रम घेण्यात आला असे त्यांनी सांगितले.

### ऐश्वर्या रायकडून अफवांना पूर्णविराम, अमिताभ बच्चन यांना वाढदिवसाच्या दिल्या शुभेच्छा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चननं तिचे सासरे आणि अभिनेता अमिताभ बच्चनला वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन कुटुंबाबरोबर सुरू असलेल्या मतभेदांच्या अफवांना पुन्हा एकदा पूर्णविराम दिला आहे. बच्चन कुटुंबातील सुनेनं इंस्टाग्रामवर 'बिग बी'साठी वाढदिवसाची एक सुंदर पोस्ट शेअर केली आहे. यावर तिनं भावनिक नोटही जोडली आहे. या पोस्टमुळे बच्चन कुटुंबाबरोबर सुरू असलेल्या मतभेदाच्या चर्चा अफवा असल्याचं स्पष्ट होत आहे. ११ ऑक्टोबर रोजी ऐश्वर्या राय बच्चननं अमि ताभ आणि तिची मुलगी आराध्याचा जुना फोटो पोस्ट केला होता. यामध्ये आराध्या आणि अमिताभ फोटोसाठी पोझ देताना दिले.

ऐश्वर्या राय दिल्या अमिताभ बच्चन यांना शुभेच्छा : ऐश्वर्या रायनं शुभेच्छा दिलेल्या फोटोत आराध्याच्या हातात फुलं आहे. तिचे आजोबा अमिताभ बच्चननं आराध्याला लाडानं जवळ घेतल्याचे फोटोत दिसून येते. अमिताभ बच्चन आणि आराध्या हे ऑल व्हाईट लूकमध्ये दिसले. फ्लोरल ड्रेसमध्ये आराध्या खूपच आकर्षक दिसत आहे. या फोटोवर ऐश्वर्यानं कॅप्शनमध्ये लिहिलं, 'हॅपी बर्थडे पा-आजोबा देव तुम्हाला सदैव आनंदी ठेवो.' या पोस्टवर ऐश्वर्यानं काही सुंदर इमोजी जोडले आहेत. यापूर्वी ऐश्वर्या रायनं घटस्फोटाच्या अफवांना ब्रेक लावला होता. नुकतीच ती मुलगी आराध्याबरोबर पॅरिस फॅशन वीकमध्ये सहभागी झाली होती. ती अनेक ठिकाणी अभिषेकबद्दलच्या भावना व्यक्त करताना दिसते.

बच्चन कुटुंबातील तणाव : गेली काही महिने बच्चन कुटुंबात तणाव असल्याच्या अफवा पसल्या आहेत. ऐश्वर्या ही अनेक दिवस बच्चन कुटुंबाबरोबर सार्वजनिक ठिकाणी गेलेली नाही. अनंत अंबानी आणि राधिका मर्चंटच्या लग्नादरम्यान, ऐश्वर्या आराध्याबरोबर आली होती. तर अभिषेक, अमिताभ, जया आणि श्वेता बच्चन एकत्र दिसले होते. यामुळे कौटुंबिक कलहाच्या अफवांना खतपाणी मिळले होते. यानंतर अभिषेकनं घटस्फोटाची इन्स्टाग्रमावरील पोस्ट लाईक केल्यानंतर अफवेनं अधिकच जोर धरला होता. दरम्यान ऐश्वर्याच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचं झालं तर शेवटी ती तामिळ चित्रपट 'पोन्नियिन सेलवन: २'मध्ये दिसली होती. तिचा हा चित्रपट रुपेरी पडद्यावर सुपर हिट ठरला होता. या चित्रपटामध्ये तिच्याबरोबर साऊथ स्टार विक्रम हा दिसला होता.

### या स्पर्धेसाठी टीम इंडियाची घोषणा, रॉबिन उथप्पा असेल कर्णधार

नवी दिल्ली : अलीकडेच, क्रिकेटच्या सर्वात रोमांचक स्पर्धांपैकी एक असलेल्या हाँगकाँग सिक्सच्या पुनरागमनाची घोषणा करण्यात आली. १ ते ३ नोव्हेंबर दरम्यान खेळल्या जाणाऱ्या या स्पर्धेत १२ देशांचे संघ सहभागी होत असून यामध्ये भारतीय संघाचाही समावेश आहे. टीम इंडियाने आता यासाठी आपला संघही जाहीर केला आहे. संघात ७ खेळाडूंचा समावेश करण्यात आला असून, त्यांचा कर्णधार रॉबिन उथप्पा असेल. त्यांच्याशिवाय स्टुअर्ट बिन्नी, केदार जाधव, मनोज तिवारी, शाहबाज नदीम, भरत चिपली आणि श्रीवत्स गोस्वामी यांचाही संघात समावेश आहे. ही स्पर्धा १९९२ मध्ये पहिल्यांदा आयोजित करण्यात आली होती. त्याची शेवटची आवृत्ती २०१७ मध्ये खेळली गेली होती. ७ वर्षांनंतर हाँगकाँग पुन्हा एकदा या स्पर्धेचे आयोजन करत आहे. भारतीय संघाने २००५ मध्ये एकदाच हे विजेतेपद पटकावले आहे.

# तृतीयपंथीयाचा गळा चिरून मृतदेह विहिरीत टाकला

- संशयीत आरोपीस पोलीसांनी घेतले ताब्यात; स्था.गु.शा.चे पो.निरि.पंकज जाधव यांची माहिती
- सिरसगाव मंडप शिवारातील विहिरीत आढळला होता तृतीयपंथीयाचा कुजलेला मृतदेह

दैनिक आपला विदर्भ



**जालना/प्रतिनिधी :** भोकरदन तालुक्यातील शिरसगाव मंडप शिवारातील सोमनाथ सहाने यांच्या शेतातील विहिरीत पाणी काढण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याला दि.१० गुरूवार रोजी सांयकाळच्या सुमारास एक मृतदेह तरंगताना आढळून आला होता. हा मृतदेह ३५ ते ४० वर्षीय महिलेचा असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. घटनेची माहिती मिळताच भोकरदनचे पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांच्यासह पोलीस उपनिरीक्षक पवन राजपूत व पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी ग्रामस्थांच्या मदतीने सदर मृतदेह विहिरीतुन बाजेच्या साह्याने बाहेर काढण्यात आला.सदर मृतदेह स्त्रीचे कपडे परिधान केलेले असल्यामुळे महिलेचा असल्याचा अंदाज होता, मात्र, यावेळी करण्यात आलेल्या पंचनाम्यात सदर व्यक्ती तृतीयपंथी असल्याचे निदर्शनास आले होते. या मृतदेहाचा गळा कापण्यात आलेला असून, मृतदेह कुजलेल्या अवस्थेत असल्याने ही घटना अंदाजे दोन-तीन दिवसांपूर्वी घडल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.दरम्यान, सदर तृतीयपंथी व्यक्तीचा गळ्यावर आणि गालावर चाकूने वार केल्याचे पोलीसांना आढळून आले. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने याप्रकरणाचा तपास करीत असताना सर्वप्रथम सदरील मृतदेहाची ओळख पटवली.शेख नवाज शेख शरिफ (वय १७ वर्षे) रा.मालेगाव असे मयताची ओळख निष्पन्न झाल्याने हा घातपात कुणी केला याचा तपास करीत असताना स्थानिक गुन्हे शाखेला तपास करत आसताना तसेच गोपनिय माहिती गोळा करत असताना संशयीत आरोपी अनवर शहा अहमद शहा रा. नारेगाव यास पोलीसांनी नगर-पुणे महामार्गावरील कामडगाव शिवारातील एक हाटेल मधून त्यास ताब्यात घेण्यात आले. त्यास पोलीसांनी विचारपूस केली असता सदरील खून केल्याचे आरोपीने कबूल केले आहे.आरोपी अनवर शहा यास पोलीसांनी ताब्यात घेऊन भोकरदन पोलीसांच्या स्वाधिन करण्यात असल्याची माहिती आज दि.१२ शनिवार रोजी दुपारी दोन वा.च्या सुमारास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरिक्षक पंकज जाधव यांनी दिली आहे.

# मोताळा तालुक्यात ढगफुटी सदृश्य पाऊस

## नुकसानग्रस्तांना तात्काळ मदत करा : ॲड. जयश्रीताई शेळके

दैनिक आपला विदर्भ

**मोताळा/प्रतिनिधी :** मोताळा तालुक्यात शुक्रवार दि.११ ऑक्टोबर रोजी ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्याने पिकांची प्रचंड हानी झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातचा घास हिरावला आहे. पिके कापणीच्या तोंडावर ढगफुटी सदृश्य पावसाने पुरती वाट लागली आहे. या नैसर्गिक संकटाने शेतकरी हवालदिल झाला असून शेतकऱ्यावर आर्थिक मदत तात्काळ करावी,अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे. मोताळा तालुक्यात शुक्रवार दि.११ ऑक्टोबर रोजी झालेल्या डगपोटी सदृश्य पावसाने काही ठिकाणच्या विहिरी खचून गेल्या आहेत. त्याचबरोबर काढण्यात आलेल्या पिकांचे सुद्धा मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी घरांची पडझड झाली असल्याने नागरिकांची मोठी तारांबळ उडाली आहे. नुकसान झाले आहे. परतीच्या पावसाने शेतकऱ्यांची चांगलीच तारांबळ उडाली आहे. अनेकांची घरे पडल्याने त्यांचा संसार रस्त्यावर आला आहे. अचानक पडलेल्या ढगफुटी सदृश्य पावसाने मात्र जिकडे तिकडे पाणीच पाणी झाल्याने नागरिकांची एकच तारांबळ उडाली नुकसान टाळण्यासाठी नागरिकांची धावपळही झाली.





### नुकसानग्रस्तांना तात्काळ मदत करा : ॲड.शेळके

मोताळा तालुक्यात तालुक्यात ढगफुटी सदृश्य पावसाने पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाली आहे. तर अनेकांची घरे पडून त्यांचेही मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या नुकसानग्रस्त भागाची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सचिव ड जयश्री शेळके यांनी भेट देऊन पाहणी केली. ढगफुटी सदृश्य पावसाने झालेल्या नुकसानीचा तात्काळ सर्वे करावा नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत करावी यासाठी ड्.शेळके यांनी मोताळा येथील तहसीलदार यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा करून नुकसानग्रस्त शेतकरी व घराची पडझड झालेल्या नागरिकांना तात्काळ मदत करावी,अशी मागणी केली.

## विविध वृत्त...


### मंत्री छगन भुजबळ यांच्यामुळे मराठा समाजाचे आरक्षण अडल्याचा माजी खासदार राठोडांचा आरोप



दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी :** नारायणगड मेळाव्यात जरांगे पाटील सरकारला अल्टीमेटम दिला आहे. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी केली आहे. यावर माजी खासदार हरिभाऊ राठोड यांनी प्रतिक्रिया दिली. मंत्री छगन भुजबळ यांच्यामुळे मराठा समाजाचे आरक्षण अडल्याचा आरोप माजी खासदार राठोड यांनी केला आहे. राज्यात सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाप्रमाणे ओबीसिच्या आरक्षणाला धक्का न लागता उपवर्गीकरण करून कुणबी-मराठा वेगळे आरक्षण देता येईल. जेणे करून सगे सोयरे किंवा हैद्राबाद गॅझेट याची गरज पडणार नाही. ,असेही माजी खासदार राठोड यांनी स्पष्ट केले.

### खामगावात रावणाचे दहन, आमदार फुंडकरांनी दिल्या शुभेच्छा



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथील श्री बालाजी संस्थांच्या वतीने दरवर्षी विजयादशमी मोठ्या उत्साहात विविध धार्मिक उपक्रमांनी साजरा करण्यात येतो. त्याचप्रमाणे यावर्षी सुद्धा संस्थांच्या वतीने रावण टेकडी येथे रावणाच्या पोस्टरचे दहन करण्यात आले. यावेळी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. पोलिसांचा दगडा बंदोबस्त लावण्यात आला होता. फटाक्यांच्या आतिषबाजीत रावणाच्या पोस्टरचे दहन करण्यात आले. मागील वर्षी रावणाच्या पुतळ्याचे दहन करण्यात आले होते मात्र पावसामुळे रावणाचे अर्धवट दहन झाले होते. त्यामुळे यावर्षी रावणाचे वीस फुटाचे पहिले चित्र लावून वेशभूषा असलेल्या श्रीराम यांच्या तनुष्यबाणाने रावणाचा वध करून दहन करण्यात आले. आमदार आकाश फुंडकर, माजी आमदार दिलीप कुमार सानंदा यावेळी उपस्थित होते. अंधारावर मात करून प्रकाशाकडे जाण्याकरिता हा उत्सव आपण सर्वजण मोठ्या उत्साहात साजरा करत असतो. येणार वर्ष हे सर्वांच्या आयुष्यात सुख समृद्धी व आरोग्यमय जावो अशी प्रभु श्री रामचंद्र यांच्या चरणी प्रार्थना आमदार आकाश कुंडकर यांनी केली आहे.

### कोल्हापुरात दिसला शाही दसऱ्याचा थाट, संभाजीराजेंची रोल्स रॉयसवर टिकल्या सर्वांच्या नजरा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विजयादशमीनिमित्त आज कोल्हापुरात मोठ्या प्रमाणात तयारी सुरु झालेली आहे. कोल्हापुरातील शाही दसरा सोहळ्या हा देशातील सर्वात लोकप्रिय दसरा सोहळा मानला जातो. देशातील म्हैसुर पाठोपाठ कोल्हापुराचा शाही दसरा जास्त प्रसिद्ध आहे.

गेल्या अनेक वर्षापासून कोल्हापुरात या शाही सोहळ्याची परंपरा पार पडत आहे. दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील हा शाही सोहळा मोठ्या थाटामाटात पार पडणार आहे. ३ ऑक्टोबर पासून १२ ऑक्टोबर दरम्यान जिल्हा प्रशासनाने दसऱ्या निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

दोन दिवसांपासून शाही दसरा सोहळ्याची तयारी सुरु

या शाही दसरा सोहळ्यामध्ये खंडेनवमीचे शस्त्रपूजन करण्यात येणार आहेत. तसेच त्यानंतर परंपरेनुसार करवीर निवासिनी महालक्ष्मी देवीची पालखी सायंकाळी ६ वाजेपर्यत चौकात येणार आहे. याच ठिकाणी छत्रपती घराण्यातील मान्यवर देखील या शाही दसऱ्याला उपस्थित राहणार आहे. यामध्ये छत्रपती घराण्याचे मानकरी तसेच प्रशासनातील प्रमुख अधिकारी आणि कोल्हापूरचे सर्व नागरिक उपस्थित असणार आहे. हा शाही दसरा पाहण्यासाठी लाखो लोक कोल्हापूरात गर्दी करत असतात. या शाही दसरा सोहळ्याची गेल्या दोन दिवसांपासून तयारी सुरु आहे.

सोने खरेदी करण्यासाठी सराफ बाजार सुरु

विजयादशमी हा साडेतीन मुहूर्तापैकी एक मुहूर्त मानला जातो. या दिवशी लोक मोठ्या प्रमाणात सोने खरेदी करतात. त्याबरोबर अनेक जण नवीन वस्तू किंवा गाड्या खरेदी करत असतात. यामुळे विजयादशमीला सोने-चांदी अशा मौल्यवान वस्तू खरेदी करण्याची ही जुनी परंपरा आजही टिकून आहे. त्यामुळेच नेहमी प्रमाणे कोल्हापुरातील सराफ बाजार हा शनिवारी बंद असतो. मात्र, विदयादशमीनिमित्त हा सराफ बाजार सोने खरेदी करण्यासाठी आज सुरु ठेवण्यात येणार आहे. कोल्हापुरात वाहन किंवा इतर मौल्यवान वस्तू असणाऱ्या बाजारपेठाही सजवण्यात आल्या आहे. या बाजार पेठांना आज आनोखे रुप आले आहे.

# ध्येयवेढ्या मयूरच्या वृक्ष प्रेमाने शाळेचा परिसर हिरवळने बहरला

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** प्रत्येकाला कोणता आणि कोणता छंद असतो मात्र हा छंद जोपासताना सामाजिक हित जोपासून छंद केला तर तो इतरापेक्षा वेगळा ठरतो असाच छंद ध्येयवेढ्या मयूर ने वृक्ष संवर्धनाचा जोपासला अन शाळा परिसर व रस्ते हिरवळीने भरून गेले आता मात्र या मयूरच्या वृक्ष प्रेमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मयुर सातत्याने निसर्ग संवर्धन साठी झटत असतो, सुरवातीला प्रत्येक सरांच्या वाढदिवसाला एक झाड वृक्षारोपण करायचे या उपक्रमाने सुरुवात केली. प्रत्येक शिक्षकांच्या वाढदिवसाला मयूर वृक्षरोपण करत होता. यातून मिळणारा आनंद ह अनमोलह होता या आनंदाने व प्रत्येक शिक्षकांच्या वाढदिवसाला लावलेल्या वृक्ष ने मयूर हा हळूहळू निसर्गाशी जुळत गेला अन् मयूर शेकडो वृक्ष लावत गेला. आज रोजी मयूरने लोणार पंचायत समिती अंतर्गत येणारी गोत्रा येथील जिल्हा परिषद शाळा, सावरगाव मुंढे येथील जिल्हा परिषद शाळा, मढी येथील जिल्हा परिषद शाळा अश्या शाळा दत्तक घेत हजारो वृक्षांची लागवड केली आहे. विशेष म्हणजे लावलेल्या झाडांपैकी एकही झाड मेले नाही. तर दरवर्षी ग्रामपंचायत स्तरावर वृक्ष लागवड केली जाते.पण त्यातील फार कमी वृक्ष जगतात. हेही एक वास्तव आहे.





### सामाजिक दायित्वाचा भान

निसर्ग असो की समाज त्यांच्याकडून आपण भरभरून घेतो, मात्र त्या प्रमाणात आपण त्यांची परतफेड करत नाही. नैसर्गिक समतोल आता वेगळच चालला असून त्याचे परिणाम ही दिसू लागले आहेत. त्यामुळे आपलेही त्यांना देण्याचे काहीतरी सामाजिक दायित्व असते. या सामाजिक दयित्वातून छोट्याशा स्वरूपात सुरू केलेल्या या उपक्रमाला आता चांगला प्रतिसाद मिळत आहे. सामाजिक दयतवातून वृक्षारोपण केल्यानंतर त्यातून मिळणारा आनंद हा गगनात न मावणारा आहे. वृक्षांना जेव्हडे आपण प्रेम देऊ त्या जोमाने ते वाढतात. अशी प्रतिक्रिया वृक्षप्रेमी मयूर ने दिली आहे.

## भारताच्या सात सदस्यीय क्रिकेट संघाची घोषणा; या टूर्नामेंटमध्ये खेळणार

**मुंबई/प्रतिनिधी :** हाँगकाँग क्रिकेट सिक्सेस टूर्नामेंटसाठी भारतीय क्रिकेट संघाची शनिवारी घोषणा करण्यात आली. ही स्पर्धा १ ते ३ नोव्हेंबर दरम्यान हाँगकाँगच्या टिन क्वांग रोड रिक्रिएशन ग्राऊंडवर खेळवली जाईल. अनेक दिग्गज खेळाडूंचा भारतीय संघात समावेश करण्यात आला असून माजी स्फोटक फलंदाजाकडं या स्पर्धे साठी भारतीय संघाची कमान सोपवण्यात आली आहे.

भारतीय संघाचा कर्णधार कोण : हाँगकाँग क्रिकेट सिक्स टूर्नामेंटसाठी भारतीय संघ जाहीर झाला आहे. या स्पर्धेसाठी स्फोटक फलंदाज रॉबिन उथप्पाला भारतीय संघाचं कर्णधारपद देण्यात आलं आहे. मर्यादित षटकांच्या क्रिकेटचा अनुभवी खेळाडू असलेल्या उथप्पानं आपल्या स्फोटक फलंदाजी आणि उत्कृष्ट क्षेत्ररक्षणानं भारतीय क्रिकेटमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिलं आहे. ऊ२० फॉरमॅटमध्ये त्याच्या चमकदार कामगिरीसाठी ओळखल्या जाणाऱ्या उथप्पानं २००७ च्या ऊ२० विश्वचषकात भारताच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली होती.

१९९२ मध्ये झाली हाँगकाँग सिक्सची सुरुवात : हाँगकाँग क्रिकेट सिक्स ही एक अनोखी, सिक्स-ए-साइड स्पर्धा आहे. जी १९९२ मध्ये सुरु झाल्यापासून क्रिकेट जगतात एक प्रमुख आकर्षण आहे. उच्च-स्कोअरिंग सामने आणि आक्रमक फलंदाजीसाठी ओळखली जाणारी, ही वेगवान स्पर्धा दर्शक आणि थेट प्रेक्षक दोघांचंही मनोरंजन करण्यासाठी डिझाइन केलेली आहे.

सचिन आणि धोनीनंही घेतला आहे भाग : सचिन तेंडुलकर, एम एस धोनी, शेन वॉर्न, वसीम अक्रम, शोएब मलिक, सनथ जयसूर्या, अनिल कुंबळे, उमर अकमल, ग्लेन मॅक्सवेल आणि डॅमियन मार्टिन यांसारख्या खेळाडूंनी या स्पर्धेत आपली ताकद दाखवली असून, पाकिस्तान, इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका या संघांनी या स्पर्धेत सर्वोत्तम कामगिरी केली आहे. या स्पर्धेत हे यशस्वी संघ आहेत.

भारतीय संघ :

रॉबिन उथप्पा (कर्णधार), केदार जाधव, मनोज तिवारी, शाहबाज नदीम, भरत चिपली, श्रीवत्स गोस्वामी, स्टुअर्ट बिन्नी

## विजयादशमी मुहूर्तावर पुण्यातील महालक्ष्मी देवीला १७ किलो सोन्याची साडी परिधान!

**पुणे/प्रतिनिधी :** आज नवरात्रोत्सवमधील दहावा दिवस म्हणजे विजयादशमीनिमित्त पुणे शहरातील सारसबाग परिसरातील श्री म हालक्ष्मी मंदिरातील देवीच्या मूर्तीला तब्बल १७ किलो सोन्याची साडी परिधान करण्यात आली आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही या देवीला सोन्याची साडी परिधान करण्यात आली असून देवीचे सुवर्णवस्त्रातील रुप पाहण्याकरीता महालक्ष्मी मंदिरात भाविकांची पहाटेपासून मोठी गर्दी जमली आहे.

देवीला ही साडी परिधान करण्याची परंपरा गेल्या अनेक वर्षापासून आहे. देवीला परिधान केलेली ही सोन्याची साडी दक्षिण भारतातील कारागिरांनी तयार केलेली आहे. २१ वर्षापूर्वी देवीच्या मुर्तीसाठी ही सोन्याची साडी तयार करण्यात आली होती. अनेक कारागिरांनी जवळपास सहा महिने ही साडी तयार करण्याचे काम केले होते. त्यानंतर ही साडी पूर्ण झाली आहे.

काय आहे साडीचे वैशिष्ट्यं?

महालक्ष्मी देवीसाठी एका भक्ताने २१ वर्षापूर्वी ही साडी अर्पण केली. ही साडी १७ किलोची असून अनेक कारागिरांनी जवळपास सहा महिने ही साडी तयार करण्याचे काम केले होते. साडीवर आकर्षक प्रकारचे नक्षीकाम करण्यात आले आहे. तसेच वर्षभरातून दोन वेळेस म्हणजे दसरा आणि लक्ष्मीपूजनाच्या दिवशी ही साडी देवीला नेसवली जाते.

# धनगर मेंढपाळ यांना अनुदानावरील साहित्याची प्रतीक्षा

## यशवंत सेना जिल्हा संपर्कप्रमुख गजानन बोरकर यांची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** धनगर मेंढपाळ समाजातील नागरिकांना शासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या अनुदानावरील साहित्य मिळण्याची प्रतीक्षा असून धनगर समाजाच्या विकासासाठी शासनाने टॅक्टर, ट्रॉली, कॉटन ताडपत्री आदी साहित्य देण्यात यावे. अशी मागणी बुलढाणा जिल्हा यशवंत सेना संपर्कप्रमुख गजानन बोरकर यांनी केली आहे. विविध समाजातील नागरिकांना त्यांच्या विकासासाठी शासनाच्या वतीने विविध प्रकारच्या साहित्याचे अनुदानावर वाटप करण्यात येते.

या साहित्यामुळे नागरिकांना मोठी मदत होऊन विकासात सुद्धा भर पडते.मात्र धनगर मेंढा बाळ समाजातील नागरिकांना अद्यापही शासनाच्या अनुदानावरील साहित्य मिळाले नाही, त्यामुळे या समाजाचा विकास खुंटलेला आहे. मुळात हा समाज मागासलेला असल्याने या समाजाच्या विकासासाठी शासनाने विशेष निधीची तरतूद करून अनुदानावर साहित्य द्यावे, अशी मागणी बुलढाणा जिल्हा यशवंत सेना संपर्कप्रमुख गजानन बोरकर यांनी केली आहे.

तसेच शेगाव तालुक्यातील शेगांव, काळखेड, अडसूळ गावात पावसाने मेंढपाळ करणाऱ्या नागरिकांची प्रचंड हानी झाली आहे. त्यामुळे या गावातील मेंढापाळ यांना सुद्धा शासनाने तात्काळ आर्थिक मदत करावी, अशी मागणी बुलढाणा जिल्हा यशवंत सेना जिल्हा संपर्क प्रमुख गजानन बोरकर यांच्यासह किरण कोळपे, समाधान कोळेकर, संदिप थोरात, गोपाळ हटकर, प्रविण थोरात, तानाजी बिचकुले, रवी थोरात, बंडू कोळपे, विकास थोरात, समिर हाके यांच्यावतीने करण्यात आली आहे.

# आचारसंहितेचे लगबग, आमदारांचं एकाच दिवशी १०१ विकास कामांचं उद्घाटन

दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानसभेचा कार्यकाळ जवळपास संपुष्टात येण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे कुठल्याही क्षणाला विधानसभा निवडणुकीचे आचारसंहिता लागण्याची शक्यता असल्याने धुळ्यात एमआयएम पक्षाचे आमदार डॉ फारुख शाह यांनी कोट्यावधी रुपयाच्या निधीतून धुळे शहराच्या विविध भागातील १०१ विकास कामांचं एकाच वेळी मॅरेथॉन उद्घाटन केल आहे. धुळे शहराच्या इतिहासात एकाच वेळी १०१ कामांचं उद्घाटन करण्याचा हा विक्रम आमदार फारुक शहा यांच्या नावे झाला आहे. शहराचा विकास होत असल्याने शहराच्या विविध भागातील नागरिकांनी आमदारांचा जंगी सत्कार करत जोरदार स्वागत केले आहे.

या कार्यक्रमाप्रसंगी धुळे शहराचे आमदार डॉक्टर फारुख यांनी धुळे महानगरपालिकेचे अधिकारी तसेच माजी नगरसेवक व माजी खासदार यांच्या विरोधात जोरदार टीकास्त्र सोडला आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये धुळे महानगरपालिकेमध्ये असलेल्या नगरसेवकांनी नेहमीच माझ्या कामांना विरोध केला. त्यांची कुठलीच साथ मला मिळाली नाही. त्यामुळेच धुळ्यातील जनतेने माजी खासदारांची चांगलीच विकेट घेतली अशी देखील टीका त्यांनी यावेळी सुभाष भामरे यांच्यावर केली. आणि म्हणून आता यापुढे धुळे महानगरपालिकेवर भाजपची कधीही सत्ता येणार नाही असा विश्र्वास देखील त्यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच पुढे बोलताना आमदार फारुख शाह यांनी सांगितले की, धुळे शहरात जे काही जातीय तेढ निर्माण झाली होती ती जातीय तेढ मी समाजातील सर्व घटकांना एकत्र घेऊन कायमस्वरूपी संपवण्याचे काम मी केले आहे.

